## निशाण क्र. २५६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी याने कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सदरील कामी दाव्याचे संदर्भात महत्वाचे कागदपत्र न्यायालयात हजर करावयाचे आहेत. सदरचे कागदपत्र हे न्यायपुर्ततेच्या दृष्टीने महत्वाचे असे आहेत. केवळ नजरचुकीने कागदपत्र हजर करणेस झालेल्या उशीराची माफी करून सदर कागदपत्र हजर करणेस परवानगी मिळावी, अशी प्रस्तूत प्रतिवादी याने विनंती केली आहे.

२. वादी ने नि. क्र. २५७ वर सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रस्तूत दावा दाखल झाल्यानंतर वादीतर्फे साक्षीदार यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे दि. २१/११/२०१८ रोजी घेण्यात आला आहे. उर्वरीत उलटतपास घेणेकरीता प्रकरण प्रलंबित आहे. त्यानंतर सदर कागदपत्र हजर करण्यासाठीचा अर्ज सादर करण्यात आला आहे. प्रतिवादी सादर करू पाहत असलेल्या कागदांपैकी अ.क्र. १ चा कागद हा प्रतिवादीकडे सन २००२ सालपासून, अ. क्र. २ चा कागद हा प्रतिवादीकडे सन २००३ सालपासून व अ. क्र. ३ चा कागद हा प्रतिवादीकडे सन १९९६ सालपासून उपलब्ध आहे. असे असताना प्रतिवादीतर्फे सदर कागदपत्र वेळीच का सादर करण्यात आले नाहीत याबाबत प्रतिवादीने त्याचे अर्जात कोणताही उल्लेख केलेला नाही. केवळ नजरचुकीने सदर कागदपत्र हजर करणेस उशीर झाल्याचे कारण खोटे आहे. प्रतिवादीने त्याचे बचावाचे सर्व कागद त्याची कैफियत दाखल करतेवेळी दाखल करणे तसेच त्यानंतर न्यायालयाने मुद्दे निश्चित करण्यापूर्वी दाखल करणे दिवाणी प्रक्रियेतील तरतुदीनुसार आवश्यक आहे. असे असता प्रतिवादी केवळ मोघम अर्ज सादर करून आता विलंबाने सदर कागद याकामी दाखल करू पाहत आहे. सबब प्रतिवादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १३ नियम २ नुसार आवश्यक ती कागदपत्रे पक्षकारांच्या कब्जामध्ये असताना सुध्दा दाव्याच्या चौकशीवेळी त्यांनी दाखल केली तर त्या पक्षकारांनी संयुक्तिक कारण दाखवले तरच ती कागदपत्रे सामील करून घेता येईल अशी तरतूद आहे. सदरची कागदपत्रे प्रतिवादींनी उशीरा दाखल केली आहेत त्यामुळे त्याबाबतचा खर्च देणेस प्रतिवादी बंधनकारक आहेत. सदरचा दावा हा ठराव व कायमस्वरूपी ताकीदीकरीता आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस क्रमप्राप्त आहे असे वाटते. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे :

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत प्रतिवादी याने रूपये ३००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रूपये १५०/— वादीस दयावेत व उर्वरित रक्कम विधी सेवा समिती सिंधुदुर्गला जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : ०१/१०/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.10.02 11:19:49 +0530